# प्रकरण ५ वे

## निष्कर्ष आणि शिफारशी

### विभाग "अ"

### निष्कर्ष

५ [क] प्रास्ताविक:

प्रकरण नं. १ ते ३ मध्ये इयत्ता ८ वी ते १० वी च्या इतिहास अध्यापनामध्ये आढळणाऱ्या सर्वसामान्य चुकांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. वरील सर्व प्रकरणे तात्वीक स्वरुपाची आहेत. प्रकरण क्र.४ मध्ये शिक्षक, मुख्याध्यापक यांच्या इतिहास अध्यापनाबाबतच्या प्रतिसादाचे तसेच शाळांना दिलेल्या भेटीव्दारे मिळालेल्या माहितीचे विश्लेषण आणि विशदीकरण केले आहे. या प्रकरणाच्या आधारे अभ्यासकाने पुढील प्रकरणात संशोधनाचे निष्कर्ष आणि शिफारशी दिल्या आहेत.

५ [ख] शिक्षकांच्या वैयक्तिक माहिती विषयी निष्कर्ष:

[१] इतिहासाचे अध्यापन करणारे -
२५.७२% शिक्षक बी.ए.बी.एड्. आहेत.
२०% शिक्षक एस.एस.सी.डी.एड्. आहेत.
१४.२८% शिक्षक सिनिअर पी.टी.सी. आहेत.
११.४२% शिक्षक एम.ए., एम्.एड्. आहेत.
८.५७% शिक्षक एम.ए.बी.एड्. आहेत.
५.५७% शिक्षक ज्युनियर पी.टी.सी. आहेत.

[२] बी.ए.बी.एड्. प्रशिक्षितांची शिक्षकांची संख्या सर्वात जास्त आहे.

[३] २८.५०% शिक्षक ११ ते १५ वर्षे अनुभव असणारे आहेत.
२२.८५% शिक्षक १६ ते २० वर्षे अनुभव असणारे आहेत.

१२५

[४] १४.२०% शिक्षक ६ ते १० वर्षे अनुभव असणारे आहेत.

[५] सर्वात अधिक शिक्षक ११ ते १५ वर्षे अनुभव असणारे आहेत.

५ [ग] इतिहास अध्यापनाच्या उद्दिष्टाबाबत निष्कर्ष :

[६] इयत्ता ९वीला शिकविणाऱ्या शिक्षकांची संख्या सर्वात अधिक [७४.२८%] आहे.

[७] शाळेत शिकविण्यात येणाऱ्या इतर विषयापैकी भूगोल[५७.१४%] आणि मराठी [४९.९९%] विषय शिकविणारे इतिहासाचे शिक्षक अधिक आहेत.

[८] इतिहास विषयाच्या विविध उद्दिष्टापैकी शिक्षकानी तीन उद्दिष्टांना अधिक महत्व दिले आहे.

[९] ६४.२८% शिक्षकांनी इतिहास अध्यापनातून नागरिकत्वाची जाणीव निर्माण झाली पाहिजे असे मत व्यक्त केले आहे. ६४.२८% शिक्षकांनी इतिहासाचे अध्यापनातून राष्ट्रीय भावना वाढीस लागली पाहिजे असे मत व्यक्त केले आहे. आणि राष्ट्रीय एकात्मता निर्माण केली पाहिजे. असे स्पष्ट केले आहे.

[१०] बहुतांशी शिक्षकांच्या मते [५८.५७%] उद्दिष्टये मोठया प्रमाणात साध्य होतात.

[११] उद्दिष्टये साध्य न होण्याची प्रमुख कारणे खालील प्रमाणे होत.

[अ] उद्दिष्टे व्यापक आहेत [४८.५७%]

[ब] वेळ कमी पडतो [४४.२८%]

[क] पाठयपुस्तके अपुरी. [३५.७१%]

५[घ] अभ्यासक्रमाविषयीचे निष्कर्ष :

[१२] आजच्या अभ्यासक्रमात इतिहास विषयाला महत्वाचे स्थान आहे. [८२.८५]

[१३] माध्यमिक स्तरावर सर्वच इयत्तासाठी इतिहास विषयासाठी १०० गुणांचा पेपर ठेवावा. [५२.८५%]

[१४] ९५.७१% शिक्षकांच्या मते इतिहासाच्या अभ्यासक्रमात स्थानिक इतिहासाचा समावेश करावा.

[१५] शालेय वेळापत्रकात इतिहास विषयासाठी कमी तासिका आहेत. त्या पुरेशा नाहीत [६७.१४%] आठवड्यातून इतिहास विषयासाठी दोनच तासिका आहेत. [६८.५७%] शाळांना दिलेल्या भेटीत हीच परिस्थिती दिसली.

[१६] ४०% शिक्षकांनी शालेय वेळापत्रकांत इतिहास विषयाचा सातवा तास आहे असे मत व्यक्त केले आहे. [१७.२८% शिक्षकांनी शालेय वेळापत्रकांत इतिहास विषयाचा १ ला तास आहे असे मत व्यक्त केले आहे.] हा क्रम अयोग्य आहे. [८२.८५%]

[१७] शालेय वेळापत्रकात सातवा तास आहे म्हणणा-या शिक्षकांची संख्या जास्त आहे. म्हणून शालेय वेळापत्रकामध्ये पहिला किंवा दुसरा तास असावा असे मत व्यक्त केले आहे.

[१८] ६१.४२% शिक्षकांनी इतिहास विषयातील कृत्या व मुद्दे विद्यार्थ्यांच्या वयोमानानुसार बोजड वाटतात असे मत मांडले आहे. ४०% मुख्याध्यापकानी हेच मत व्यक्त केले आहे. २०% शिक्षकांनी परकिय इतिहास विद्यार्थ्यांच्या वयोमानानुसार बोजड वाटतो असे मत व्यक्त केले आहे.

५ [च] <u>अध्यापन पध्दती व शैक्षणिक साधना विषयीचे निष्कर्ष :</u>

[१९] दैनंदिन अध्यापनात शिक्षक कथनात्मक [६८.५७%] आणि कथाकथन [११.४२%] पध्दतींचा वापर करतात. ३५% शिक्षक कथनात्मक पध्दतीचा वापर करतात असे मुख्याध्यापकांचे मत आहे. ८०% शिक्षक पारंपारिक पध्दतीचा वापर करतात असे विद्यार्थ्यांचे मत आहे. ५०% शिक्षक खुर्चीवर बसूनच इतिहासाचे अध्यापन करतात असे शाळाना दिलेल्या भेटी अभ्यासकाच्या निदर्शनास आले.

[२०] अध्यापनाच्या वेळी शिक्षक विचार प्रवर्तक [६५.७१%] उजळणी वजा [२५.७१%] आणि समस्या प्रधान [१८.५७%] प्रश्न विचारतात. इतिहास विषयात विद्यार्थ्यांना गोडी वाटावी [३२.२८%] आणि घटकाचे दृढीकरण व्हावे [३२.२८%] या हेतुने हे प्रश्न विचारले जातात.

[२१] इतिहास विषयाच्या स्वाध्यायाचे मुल्यमापन व बहुतांशी शिक्षक [८१.४२%] करतात. विद्यार्थ्यांची प्रगती आजमावण्यासाठी ही बाबत समाधानकारक आहे.

[२२] इतिहासाच्या अध्यापनाच्या वेळी चर्चा [७८.५७%] आणि पोवाडा [७१.४२%] या साधनांचा वापर शिक्षक करतात.

[२३] ६८.५७% शिक्षकांना इतिहास अध्यापनात इतिहासाची साधने वापरताना अडचणी येतात. ४०% मुख्याध्यापकांच्या मते शिक्षक शैक्षणिक साधने वापरतात.

[२४] शैक्षणिक साधने वापरात, साधने उपलब्ध असणे [४८.५७%] आणि वेळ कमी पडणे [३७.१४%] ही कारणे आढळतात. मात्र ७०% शिक्षक शैक्षणिक साधनांचा वापर टाळतात असे विद्यार्थ्यांचे मत आहे.

[२५] ५७.१४% शिक्षकांनी इतिहासाचे साहित्य ठेवण्यासाठी वेगळी खोली नाही असे मत मांडले आहे. २५% मुख्याध्यापक याच मताचे आहेत.

[२६] ५२.८५% शिक्षकांनी इतिहासाच्या अध्यापनात स्थानिक इतिहासाचा उपयोग केला जात नाही असे मत व्यक्त केले आहे.

[२७] इतिहास अध्यापनाच्या वेळी ५२.८५% शिक्षक पाठ्यपुस्तकांचा उपयोग करतात. इतिहासातील घटनांचा संदर्भ देण्यासाठी [५५.७१%] आणि कठीण भागावर चर्चा करण्यासाठी वर्गात पाठ्यपुस्तकांचा वापर केला जातो. मात्र ६०% इतिहासाचे शिक्षक इतिहासाचे पाठ्यपुस्तक वर्गात वाचून दाखवतात असे विद्यार्थी म्हणतात.

[२८] ९५.७१% शिक्षकांनी इतिहासाच्या पाठ्यपुस्तकातील घटक बोजड आहेत असे मत व्यक्त केले आहे.

[२९] इतिहासाच्या अध्यापनाच्या वेळी शिक्षक खादी फलक[५५.७१%] आराखडे, चित्रे [९१.४२%], कालपट, वंशवृक्ष [८१.४२%] भित्ती पत्रके, व बाहुल्या [७२.८५%], इ. साधनांचाही वापर केला जातो. ही बाब इतिहास अध्यापनाच्या दृष्टीने स्तुत्य आहे.

५ [छ] <u>ग्रंथालया विषयी माहिती : निष्कर्ष:</u>

[३०] ८४.२८% शिक्षकांनी शाळेत इतिहास विषयाचे वेगळे ग्रंथालय नाही असे मत व्यक्त केले आहे.

[३१] परंतु ५० पेक्षा अधिक पुस्तके ग्रंथालयात नाहीत. पुरवणी वाचनासाठी ग्रंथालयातील पुस्तकांचा वापर विद्यार्थी करत नाहीत. ही बाब हानीकारक आहे.

[३२] शाळेच्या ग्रंथालयात इतिहास [६५.[illegible]%] विशेषांक आहे. शाळामध्ये लोकमत [५७.१४%] आणि मराठवाडा [४७.१४] ही दैनिके मागविली जातात. या दैनिकांचा आणि नियत कालिकांचा शिक्षक [८१.४२%] दैनंदिन अध्यापनात [७८.५७%] वापर करतात. ही बाब समाधानकारक आहे.

[३३] इतिहास अध्यापनाच्या वेळी शिक्षक विद्यार्थ्यांच्या स्वयंकृतीस वाव देतात [४७.१४%] आणि वैयक्तिक लक्षही देतात[४२.८६%].

५ [ज] <u>अभ्यासपूरक कार्यक्रमाविषयी निष्कर्ष :</u>

[३४] ७०% शिक्षक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करतात. मुख्याध्यापकही या मतांशी सहमत आहेत. ९७.१४% शिक्षक ऐतिहासिक सहलीचे आयोजन करतात.

[३५] भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविण्यासाठी [९४.२८%] शिक्षक पोवाडे, लोकगीते, लोकनृत्ये आयोजित करतात. ७०% शिक्षक इतिहास विषयावरील लेखन स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, हस्तलिखित स्पर्धा आयोजित करतात.

२९ [३६] ४७.१४% शिक्षकच प्रतिष्ठित वक्त्यांची भाषणे आयोजित करतात. वीर पुरुषांच्या जयंत्या, इतिहासातील महापुरुषांच्या जीवनावरील व्याख्याने आयोजित केली जातात. मुख्याध्यापकांचे ही असेच मत आढळून आले.

५ [इ] <u>मूल्यमापना विषयीचे निष्कर्ष</u> :

[३७] घटकाचे अध्यापन संपल्यावर ९०% शिक्षक घटक चाचणी घेतात. मुख्याध्यापकही या मताशी सहमत आहेत. घटक चाचणी घेताना ७२.८५% शिक्षक संविधान तक्ता तयार करतात.

[३८] विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मोजमाप करण्यासाठी शिक्षक विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीची नोंद [६४.२८%] ठेवतात. तसेच पदनिश्चयन श्रेणी [२८.५७%] चा वापर करतात.

[३९] ९५.७१% शिक्षक न समजलेला भाग विद्यार्थ्यांना समजावून देतात.

[४०] लेखी परीक्षेत सुधारणा करण्यासाठी तोंडी परीक्षा [७८.५७%] वर्षभरातील प्रासंगिक नोंदी [२४.२८%] आणि वस्तुनिष्ठ प्रश्न [१७.१४%] यावर भर द्यावा असे शिक्षक सुचवितात.

विभाग "ब"

: शिफारशी ::

५ [ट] शिक्षकांच्या वैयक्तिक माहितीविषयी शिफारशी :

[१] शिक्षकांच्या मिळालेल्या प्रतिसादावरून बी. ए., बी. एड. शिक्षकांची संख्या जास्त आहे. माध्यमिक पातळीवर शिकवण्यासाठी या पात्रतेच्या शिक्षकांची गरज आहे. मिळालेल्या प्रतिसादापेक्षाही पात्र शिक्षकांची संख्या आणखी वाढविणे आवश्यक आहे.

[२] शासनाने व संस्थेने शिक्षकांना ट्रेनिंगसाठी पाठवून, जास्तीत जास्त बी. ए. बी. एड. शिक्षकांची संख्या वाढविणे आवश्यक आहे. माध्यमिक पातळीवर अशा शिक्षकांची गरज आहे.

[३] इतिहासाचे अध्यापन करण्यासाठी जास्तीत जास्त शिक्षकांच्या अध्यापन अनुभवाची गरज आहे. यामुळे इतिहास विषयाची विद्यार्थ्यांना गोडी लागेल. म्हणून प्रत्येक शाळामधून अनुभवी शिक्षक नेमणे आवश्यक आहे.

५ [ठ] इतिहास अध्यापनाच्या उद्दिष्टाबाबत शिफारशी :

[४] शिक्षकांनी शाळामधून इतिहास विषयाचे अध्यापन करताना केवळ कांही उद्दिष्टांना महत्व न देता सर्व उद्दिष्टये साध्य होतील या दृष्टिकोनातून अध्यापन करावे.

[५] उद्दिष्टे साध्य न होण्याची प्रमुख दोन कारणे आहेत.

अ] उद्दिष्टे व्यापक असणे आणि

ब] वेळ कमी पडणे.

त्यासाठी उद्दिष्टे घटकानुसार ठरवावीत. नेमकी उद्दिष्टे डोळ्यासमोर ठेवावीत. तसेच आठवड्यातून दोन ऐवजी तीन तासिका इतिहास विषयासाठी ठेवाव्यात.

५ [इ] अभ्यासक्रमाविषयीच्या शिफारशी

[६] माध्यमिक स्तरावर सर्वच इयत्तासाठी १०० गुणांचा पेपर ठेवावा.

[७] इतिहासाच्या अभ्यासक्रमामध्ये स्थानिक इतिहासाचा वापर करणे आवश्यक आहे. मुलांना आपण ज्या ठिकाणी राहतो त्या ठीकारणाचा इतिहास माहित असणे आवश्यक आहे. कारण इतिहासाची सुरवातच स्थानिक इतिहासापासून होते. स्थानिक इतिहासाची तरतूद शासनाने अभ्यासक्रमात करणे आवश्यक आहे.

[८] शालेय वेळापत्रकात सातवी तासिका असल्यामुळे विद्यार्थी शारीरीक व मानसिकदृष्टया थकलेले असतात. यामुळे अध्ययन बरोबर होत नाही. त्यामुळे वेळापत्रकातील तासिका बदलणे आवश्यक आहे. शालेय वेळापत्रकांत इतिहासासाठी पहिली किंवा दुसरी तासिका ठेवण्यांत यावी असे मत शिक्षकांनी सुचविले आहे.

[९] इतिहास विषयातील विद्यार्थ्यांच्या वयोमानानुसार बोजड वाटणारे घटक बदलावेत. विद्यार्थ्यांच्या बौध्दिक व मानसिक तयारीच्या दृष्टीने जे घटक ठेवणे आवश्यक आहे असेच घटक ठेवण्यांत यावेत. शासनाने व अभ्यासक्रम मंडळाने असे घटक वगळावेत. किंवा त्या घटकांची मांडणी सोप्या पध्दतीने करावी.

५ [ई] अध्यापन पध्दती व शैक्षणिक साधने या विषयाच्या शिफारशी:

[१०] इतिहासाचे शिक्षक पारंपारिक अध्यापन पध्दतीचा अवलंब करतात. पारंपिक अध्यापन पध्दतीचा वापर न करता अध्यापनात विविध पध्दतीचा वापर करण्यांत यावा. घटकानुसार अध्यापन पध्दती बदलावी. एकच घटक अनेक पध्दतीने शिकविण्यांत यावा.

[११] शिक्षकांनी विविध प्रकारचे प्रश्न अध्यापनाच्या वेळी विचारावेत व स्वाध्यायाचे मूल्यमापन करावे.

[१२] बहुतेक शाळांमधून शिक्षक अध्यापनात शैक्षणिक साहित्याचा वापर करीत नाहीत. इतिहासाचे अध्यापन चांगले होण्यासाठी शैक्षणिक साहित्याचा वापर करणे आवश्यक आहे. प्रत्येक शाळामधून शिक्षकांनी इतिहासाची शैक्षणिक साधने तयार करून घ्यावीत व त्यांचा अध्यापनात वापर करणे आवश्यक आहे. शासनानी शाळांना आधुनिक शैक्षणिक साहित्याचा पुरवठा करणे आवश्यक आहे.

[१३] प्रत्येक शाळामध्ये इतिहासाचे साहित्य ठेवण्यासाठी वेगळी खोली असणे आवश्यक आहे. त्याशिवाय शैक्षणिक साहित्य ठेवता येत नाही व अध्यापनात वापर करता येत नाही. म्हणून शासनाने व संस्था चालकाने प्रत्येक शाळामधून साहित्य ठेवण्यासाठी वेगळी खोली बांधून देण्यात यावी.

[१४] ~~xxx~~ इतिहासाच्या पाठ्यपुस्तकाचा उपयोग वर्गात सतत केला जाऊ नये. संदर्भासाठी किंवा चित्रे, आकृतीचा वापर करतेवेळी पाठ्यपुस्तक वर्गात वापरावे.

[१५] इतिहासाचे पाठ्यपुस्तक वर्गात वाचून दाखवू नये. खुर्चीवर बसून अध्यापन करू नये. उभा राहून अध्यापन केल्यास विद्यार्थ्यांना अध्ययनास प्रवृत्त करणे, कृतीप्रवण करणे सोपे जाते.

[१६] इतिहासाच्या पाठ्यपुस्तकातील कांही घटना व इ.सन सदोष आहेत. त्यामुळे अशा प्रकारची पुस्तके बदलण्यात यावी.

[१७] इतिहासातील पाठ्यपुस्तकामध्ये इ.सनाबाबद एकमत आढळत नाही. त्यामध्ये दुरुस्ती करण्यात यावी. व पाठ्यपुस्तकातील चुकीचे घटक वगळण्यात यावेत.

५ [ग] <u>इतिहास विषयाच्या ग्रंथालयाबाबत शिफारशी</u> :

[१८] प्रत्येक शाळामधून इतिहासाचे वेगळे ग्रंथालय असावे. त्याशिवाय इतिहासाचे पुस्तके ठेवता येत नाहीत. म्हणून प्रत्येक शाळामधून

इतिहासाचे वेगळे ग्रंथालय बांधून देण्यात यावे. याची तरतूद शासनाने व संस्था चालकांनी करावी.

[१९] ग्रंथालयात इतिहास विषयाची अधिकाधिक पाठ्यपुस्तके, नियतकालिके, दैनिके आणि संदर्भग्रंथ असणे जरुरीचे आहे. शाळा, शासन, धर्मादाय संस्था, यांच्या प्रयत्नातून निधी जमवता येईल, कांही पुस्तके देणगी दाखल जमा करता येतील.

[२०] विद्यार्थ्यांना पुरवणी वाचनासाठी पुस्तके देण्यात यावीत. आठवड्यातून एक तासिका पुरवणी वाचनासाठी ठेवण्यात यावी. त्या शिवाय विद्यार्थ्यांना वाचनाची आवड व इतिहासाची गोडी लागणार नाही.

[२१] सर्व शाळेच्या ग्रंथालयात इतिहास विशेषांक व शिक्षण संक्रमण सारखी नियतकालिके असणे जरुरीचे आहे.

[२२] इतिहास अध्यापनाच्या वेळी अधिकाधिक शिक्षकांनी स्वयंअध्ययनावर भर दिला पाहिजे आणि विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष दिले पाहिजे.

५ [त] <u>अभ्यासपूरक कार्यक्रमा विषयी शिफारशी :</u>

[२३] अधिकाधिक इतिहासाच्या शिक्षकांनी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावेत, विविध स्पर्धा आयोजित कराव्यात आणि भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविण्याचा प्रयत्न करावा.

[२४] इतिहासाच्या शिक्षकांनी प्रसिध्द वक्त्यांची भाषणे आयोजित करावीत.

५ [थ] <u>मुल्यमापना बाबतच्या शिफारशी :</u>

[२५] सर्वच इतिहास शिक्षकांनी घटकाचे अध्यापन संपल्यावर संविधान तक्ता तयार करुन घटक चाचणी घ्यावी. विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मोजमाप त्या शिवाय होणार नाही.

[२६] लेखी परीक्षेचे अवास्तव महत्व कमी करण्यासाठी तोंडी परीक्षेवर तसेच वस्तुनिष्ठ प्रश्नावर भर द्यावा, विद्यार्थ्यांच्या वर्तणुकीच्या प्रासंगिक नोंदी ठेवून गुण द्यावेत.

: विभाग "क" :

-: पुढील संशोधनासाठी विषय :-

इतिहास अध्यापनाची व्याप्ती फार मोठी आहे. ही व्याप्ती कमी करून अभ्यासकाने प्रस्तुत संशोधन केले आहे. इतिहासाच्या अध्यापनाची अनेक अंगे आहेत. या अंगांचा आणि बाजूंचा सखोल अभ्यास व्हावा.

प्रस्तुत संशोधन करत असताना अभ्यासकास इतिहास अध्यापनातील अनेक अंगाचा अभ्यास करणे शक्य झाले नाही. इतिहासाचे अध्यापन प्रभावी होण्यासाठी या अंगांचा जरूर विचार व्हावा, असे संशोधकास वाटते. प्रस्तुत संशोधन करीत असताना संशोधकास इतिहास अध्यापनाच्या बाबतीत असे काही विषय आढळले, [की ज्यावर प्रकाश टाकता येईल], ते विषय पुढे दिले आहेत.

५ [ड] इयत्ता ८वी ते १० वी खेरीज इतर इयत्तांच्या इतिहास अध्यापनातील चुकांचा अभ्यास.

प्रत्येक इयत्तासंबंधी इतिहास अध्यापनातील सर्व सामान्य होणा-या चुका अभ्यासल्या पाहिजेत.

५ [ढ] इतिहास अध्यापनाच्या संदर्भात क्रमिक पुस्तकाचे मूल्यमापन:

इतिहासाच्या अध्यापनाच्या बाबतीत क्रमिक पुस्तकाचे मूल्यमापन होणे आवश्यक आहे.

अध्यापन चांगले होण्यासाठी क्रमिक अद्ययावत असले पाहिजे.

१३५ ५ (न) इतिहास अध्यापनावरील स्वाध्यायमाला :

इतिहास अध्यापनाच्या कमतरतेच्या बाजू शोधून चुका कमी करण्याच्या दृष्टीने सरावासाठी स्वाध्यायाची गरज आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना इतिहासाची गोष्टी लागण्यासाठी स्वाध्यायमाला देणे आवश्यक ठरते. याबाबत संशोधन होणे आवश्यक आहे.

५ (प) इतिहास अध्यापनातील चुकांच्या कारणांचा शोध :

चुकांचे पृथक्करण करणे एवढाच संशोधनाचा अंतिम हेतू नाही. चुका होण्या मागील कारणे शोधून काढणे हे पृथक्करणानंतरचे महत्वाचे काम आहे. म्हणून चुका होण्या मागची कारणे शोधणे हा एक संशोधनाचा विषय होऊ शकेल.

५ (फ) इतिहास अध्यापनातील चुकांवरील सविस्तर उपाय :

चुका होण्यापाठीमागील कारणांचे पृथक्करण केल्यानंतर त्यावर कोणते उपाय आहेत हे शोधून काढणे याकडे संशोधकांना वळता येईल. म्हणून इतिहास अध्यापनात ज्या अडचणी आहेत त्यावर मात करण्यासाठी टीकात्मक अभ्यास करण्याची सध्या गरज आहे.